ISSN 2278-8808 SJIF 2014 = 4.889
An International Peer Reviewed & Referred
SCHOLARLY RESEARCH JOURNAL
FOR INTERDISCIPLINARY STUDIES

# शिक्षक शिक्षणातील समस्या आणि आव्हाने

शिंदे सुहास पांडुरंग[१] , पापळ अमर रवींद्र[२] , सहाय्यक प्राध्यापक,
श्री जैन विद्या प्रसारक मंडळ संचलित अध्यापक महाविद्यालय, चिंचवडगाव, पुणे ०३३.

*Scholarly Research Journal's is licensed Based on a work at www.srjis.com*

राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडा २००५ नुसार आज शिक्षक शिक्षणाबाबत शिक्षकांची व्यावसायिक तयारी करून घेणे अत्यंत महत्त्वाचे आहे. हे जरी १९६० सालीच ओळखले गेले असले तरी आजही याबाबतचे वास्तव चिंताजनक आहे. शिक्षकांचे शिक्षण हे शैक्षणिक व्यवहाराच्या मुख्य प्रवाहामध्ये आणायला हवे. त्याच बरोबर मुलांच्या गरजांना आणि त्यांच्या शिकण्याला प्रतिसाद देणारे शिक्षक निर्माण करण्याची आवश्यकता आहे. शिक्षकांच्या प्रशिक्षणात सर्वात महत्वाची गोष्ट म्हणजे शिकणारे मुल समजून घेणे. शिक्षकाने विद्यार्थी काय शिकू शकतो याच्याशी काय शिकायचे याची सांगड घालावी. शिक्षक शिक्षणाच्या विविध टप्प्यावर शैक्षणिक आशयाची नाळ व्यवसाय व जीवनात येणाऱ्या आव्हानांशी जोडली गेली पाहिजे. तसेच शिक्षणाने मुलांना आयुष्यभर शिकत राहण्याची प्रेरणा द्यावी.

" शिक्षण म्हणजे बालकाचे शारीरिक, मानसिक व नैतिक वाढ, केवळ साक्षरता म्हणजे शिक्षण नव्हे, शिक्षण म्हणजे माणसाच्या शारीरिक, मानसिक व अध्यात्मिक अंगामधील उत्कृष्ठ्तेचा विकास व अभिव्यक्ती होय."- महात्मा गांधी

शिक्षक शिक्षण व्याख्या: " शिक्षक शिक्षणात सर्व अनुभव औपचारिक आणि अनौपचारिक क्रियांचा समावेश होतो कि ज्या व्यक्तीला शिक्षण व्यवसायाची जबाबदारी पार पडण्यासाठी आवश्यक असलेल्या योग्यता प्रदान करतात.: - सी. व्ही. गुडस.

सन १८०२ मध्ये शिक्षण तज्ज्ञ विल्ल्यम कारे यांनी बंगालमधील सेरामपुर येथे प्राथमिक शिक्षकांना प्रशिक्षित करण्यासाठी प्रशिक्षण शाळा सुरु केली. त्यानंतर गरजेनुसार शिक्षक शिक्षणाच्या प्रशिक्षण संस्थांचा विकास होत गेला तो आजतागायत सातत्याने होतच आहे. यासाठी विविध आयोग जसे कि राधाकृष्णन विद्यापीठ शिक्षण आयोग, मुदलियार आयोग, कोठारी आयोग, स्त्री शिक्षण समिती, शिक्षक परीक्षण समिती १९६७, भावनिक एकात्मता समिती, शिक्षकांसाठी राष्ट्रीय आयोग, राष्ट्रीय शैक्षणिक धोरण,

राममूर्ती समिती, रेड्डी समिती, राम ताकवले समिती, राष्ट्रीय शैक्षणिक अभ्यासक्रम आराखडा इत्यादींचा उल्लेख करता येईल. या सर्वांचा आजच्या आधुनिक काळातील दृष्टीकोनातून विचार करता अनेकविध समस्या आहेत त्याचा साकल्याने विचार करून सोडविण्याचा प्रयत्न केला तर शिक्षक शिक्षणात गुणवत्ता आल्याशिवाय राहणार नाही. त्या समस्यापैकी काही पुढीलप्रमाणे सांगता येतील.

१. प्रवेशप्रक्रिया: शिक्षक शिक्षणाचा विचार करता २०१४ च्या राष्ट्रीय शिक्षक प्रशिक्षण परिषदेने जे निकष ठरवून दिलेले आहेत त्याची अंमलबजावणी संदर्भात विचार करता प्रवेश प्रक्रिया कशी असावी? काय असावी? कधी घ्यायची? त्यासाठीचे निश्चित धोरण अद्याप ठरलेले दिसत नाही. यापूर्वीचा विचार करता बी. एड. प्रवेशप्रक्रिया ही सप्टेंबर महिन्यापर्यंत चालणारी आहे. विद्यापीठ स्तरावर अभ्यासक्रमाची अंमलबजावणी माहे जून मध्ये सुरु होते. त्यामध्ये अनुदानित, विनाअनुदानित आणि कायम विनाअनुदानित, शासकीय आणि संघटनेच्या प्रवेश चाचणी असे वेगवेगळे धोरण एकाच अभ्यासक्रम प्रवेश निश्चितीसाठी पार पडण्याचे सोयीस्कर धोरण निश्चितच एक समस्या म्हणावी लागेल. प्रवेश प्रक्रिया अत्यंत धीम्या गतीने चालणारी आहे. यात विद्यार्थ्याचा, प्रशिक्षकांचा, महाविद्यालयाचा काहीही दोष नाही हे महत्त्वाचे. या प्रवेश प्रक्रियेमुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होते. व प्रशिक्षकांची उशीरा प्रवेशित होणाऱ्या प्रशिक्षणार्थ्यांकडून झालेल्या उपक्रमांची पूर्तता करण्याबाबतीत तारेवरची कसरत होताना दिसून येते.

२. विद्यार्थीसंख्या: आजच्या बी.एड. महाविद्यालयाची प्रवेशित विद्यार्थी संख्या हि एक समस्या बनली आहे. अलीकडच्या काळात शिक्षक प्रशिक्षणात येणाऱ्या विद्यार्थ्यांच्या मानसिकतेबाबत एक प्रश्न समोर येतो. त्याचा विचार होणे आवश्यक वाटते. हुशार विद्यार्थी ( पदवी, पदव्युत्तर स्तरावर समजले जाणारे) शिक्षक प्रशिक्षणाकडे येण्याबाबत उदासीन आहेत? याचे कारण शिक्षक भरती, शिक्षकाबाबत समाजात असणारी अस्मिता, व्यावसायिक दर्जा, व्यावसायिक समाधान, शासनाचे धोरण, शिक्षण सेवक धोरण इत्यादी, इत्यादीमध्ये असू शकेल.

३. अभ्यासक्रम: अभ्यासक्रम रचनेची मूलतत्त्वाचा विचार करता दूरदृष्टी, जीवेन पूर्व तयारी, अभ्यापूरकता, कृतिशीलता आणि लवचिकता याचा सारासार विचार खऱ्या अर्थाने झालेला आहे काय? या प्रश्नाची उत्तरे सर्व स्तरावर शोधण्याचा प्रयत्न होणे गरजेचे आहे.. अभ्यासक्रमात समाविष्ट सैद्धांतिक आणि प्रात्यक्षिक कार्याचा प्रत्यक्ष शिक्षण प्रक्रियेत कसा उपयोगी ठरणारा आहे याचा स्थानिक गरजांच्या व

**भविष्यकालीन गरजांच्या दृष्टीकोनातून विचार होणे आवश्यक वाटते. बी. एड. अभ्यासक्रमाचा विचार करता तो कागदोपत्री पूर्ण करण्यावरच जास्तीत जास्त भर दिला जाताना दिसून येतो. प्रवेशप्रक्रिया, विद्यार्थ्यांची महाविद्यालयातील अनुपस्थिती, पुढील वर्षी महाविद्यालयास विद्यार्थी मिळविण्याची नीती याचा परिपाक प्रशिक्षणार्थी केवळ खर्डेगिरी करताना व प्रशिक्षक केवळ पर्यवेक्षण करून प्रशिक्षानार्थ्यांचे कामकाज कसे पूर्ण होईल हे पाहतानाचे चित्र दिसून येत आहे.**

**४. सोयी सुविधा: बी. एड. बाबतीत प्रशिक्षणाचा विचार केला असता मानवी व भौतिक सोयी सुविधांचा साकल्याने विचार करावासा वाटतो. महाविद्यालयात मानवी व भौतिक सोयी सुविधा आहेत आणि असतील तर खऱ्या अर्थाने कुठे आहेत याचा प्रत्यक्ष गाजावाजा न करता मागोवा घेण्याची गरज आहे. महाविद्यालयाचे निकष खऱ्या अर्थाने पूर्ण आहेत का? याची उघडपणे चर्चा करणे हे एक आव्हानच म्हणावे लागेल. या प्रक्रियेतील जाणकाराना त्याचा यथायोग्य अनुभव नित्यानेच येत असतील.**

**५. शिक्षक प्रशिक्षकांची गुणवत्ता: शिक्षक प्रशिक्षकांची गुणवत्ता हि एक समस्या म्हणावी काय असा प्रश्न पडतो. व्यावसायिक पात्रतेचे निकष, त्यातील पळवाटा, आणि महाविद्यालयीन स्तरावर मिळणारी संधी, सेवांतर्गत प्रशिक्षण, कार्यसमाधानता , कार्यसंस्कृती , व्यावसायिक समाधान, आर्थिक बाब, इत्यादी गोष्टींचा विचार करता येईल. प्रशिक्षणाची गुणवत्ता ही मुख्यत: ते प्रशिक्षण शिक्षकांच्या गरजांशी किती सुसंगत आहेत यावरून ठरते. बहुसंख्य महाविद्यालयात या गोष्टीला सोयीस्करपणे दुर्लक्ष केले जाते.**

**६. मूल्यमापन: अभ्यासक्रम या मुद्द्याचा विचार केला केला प्रशिक्षनार्थ्याचे अंतर्गत मूल्यमापन अभ्यासक्रमाचे मूल्यमापन ही एक समस्या म्हणावी लागेल. आज अंतर्गत मूल्यमापन पूर्ण करून घेण्याची सर्वार्थाने व सर्वांगाने सर्वस्वी जबाबदारी शिक्षक प्रशिक्षकावर आहे असे वाटते. प्रशिक्षणार्थ्याला अंतर्गत मूल्यमापन केवळ औपचारिकता पूर्ण करण्याची बाब आहे असे काहीसे चित्र आजच्या बी. एड. प्रशिक्षानार्थ्याच्या अनुभवावरून संगावेसे वाटते.**

**७. संशोधन: शिक्षक शिक्षणाचा भविष्यकालीन दृष्टिकोनाचा विचार करता सर्वच स्तरावर संशोधन होणे गरजेचे आहे असे वारंवार ठासून सांगणाऱ्या कार्यशाळा, परिषदा, चर्चासत्रे, परिसंवाद हे सर्वश्रुत आहे. पण समस्या ही वाटते की, विद्यापीठीय स्तरावर झालेल्या संशोधनाचा आधार खरोखरच अहवाल, आयोग, धोरण निश्चित**

करणारे कितपत स्वीकारतात. संशोधन हे फक्त पदवी मिळविण्याची औपचारिक पार पाडणे आहे काय? असा प्रश्न सर्वसामान्यांना पडल्याशिवाय राहत नाही. संशोधनाची संख्या वाढत आहे पण त्यातून गुणात्मकता बाहेर पडताना क्वचितच दिसून येते. संशोधन करणाऱ्यामध्ये जे करत आहेत त्याच्यांशी झालेल्या चर्चेतून अनुभवाला आलेली गोष्ट म्हणजे मार्गदर्शक सांगतील किंवा सुचवतील त्याच गोष्टीवर संशोधन केले पाहिजे. अन्यथा तुम्ही निवडलेल्या विषयावर तुम्हाला संशोधन करण्याची संधी उपलब्ध होणार नाही. हा विचार पदवीपूरता मर्यादित करता येईल. याव्यतिरिक्त संशोधनाचा विचार होणे गरजेचे आहे.

८. प्रवेशशुल्क: बी. एड. अभ्यासक्रमाच्या प्रवेश शुल्काचा विचार करता ही एक समस्याच आहे असे म्हणता येईल. अनुदानित, विनाअनुदानित व कायम विनाअनुदानित धोरणामुळे शिक्षण शुल्क निश्चित केले तरी त्यात तफावत दिसून येते. महाविद्यालयीन स्तरावर या नियमांची अंमलबजावणी खऱ्या अर्थाने कशी होते याची सर्वार्थाने कबुली समकालीन प्रशिक्षण घेतलेले आणि घेणारे प्रशिक्षणार्थीच देऊ शकतील.

९. पालकत्व: आज शिक्षक प्रशिक्षकाला पालकत्वाची जबाबदारी पार पाडावी लागत आहे. ही समस्या म्हणावी काय याचीच संभ्रमावस्था आहे. याचे कारण असे की विद्यार्थ्याचा प्रवेश निश्चित झाला की तो प्रशिक्षणार्थी समजला जातो. अगोदरच शिक्षक प्रशिक्षणाला आलेली पाठरावस्था प्रवेशाच्या दृष्टीकोनातून तसेच प्रवेशित होणाऱ्या विद्यार्थ्यांमध्ये झालेली लक्षणीय कमी व प्रशिक्षणार्थी याची प्रशिक्षणाबाबतची उदासीनता याची परिणती प्रशिक्षकाला मिळणारे पालकत्व होय. हे पालकत्व काहीही व कसेही करून प्रशिक्षणार्थ्याचे ठराविक काळात प्रशिक्षणासाठीचे अंशतः पूर्तीसाठी लागणाऱ्या कार्यपूर्तीचे आहे असे म्हणता येईल.

१०. अप्रगत साधने: बी.एड. महाविद्यालयात प्रगत साधनाच्या नावाखाली आज उपलब्ध असणारी जी साधने आहेत ती अप्रगत आहेत असे म्हणणे कदाचित वावगे ठरेल कारण भविश्यकाअलीन गरजांचा विचार केला तर महाविद्यालय LCD Projector, OHP, संगणक कक्ष अशा बोटावरच मोजता येणाऱ्या गोष्टींचा समावेश आहे हे सर्वमान्य पण याची प्रत्यक्ष हाताळणी किती प्रशिक्षक करतात व प्रशिक्षणार्थ्यांना या साधनांचा वापर करण्याची व त्यावर प्रभुत्व मिळविण्याची संधी किती प्रमाणात मिळते? याचा विचार वेळ, कालावधी, करावयाचे उपक्रम व त्यामध्ये मिळवायचे प्रभूत्व व नैपुण्य याचा विचार चिंतनीय आहे.

११. **व्यावसायिकता:** शिक्षक प्रशिक्षणाचा विचार केला असता याची सर्वस्वी धुरा सांभाळणाऱ्या शिक्षक प्रशिक्षकाची व्यावसायिकता, व्यवसायनिष्ठा याबाबत काही समस्या सांगता येतील. व्यावसायिक दर्जा उंचावण्यासाठी केल्या जाणाऱ्या प्रयत्नाना सर्वच शिक्षक प्रशिक्षकाकडून प्रतिसाद दिला जातो असे नाही. प्रत्येक बाबतीत किमान धोरण राबविण्याचे काम या गटाकडून होते त्याला तशी करणेही जबाबदार आहेत. NCTE ने API लागू केला तेंव्हा कार्यशाळा, परिसंवाद, चर्चासत्रे, उद्‌बोधन वर्ग, उजळणी वर्ग यांचे जणू पिकच उतू आले आहे कि काय अशी स्थिती आपण सर्वांनी याची देही याची डोळा अनुभवली. API बाबतची पूर्तता सोयीस्कर रीत्यापूर्ण करणारा वर्ग सुद्‌धा पहावयास मिळाला तसेच शिक्षणविभागासाठी API शिथिलता दिसून आली आणि कार्यशाळा, परिसंवाद, चर्चासत्रे, उद्‌बोधन वर्ग, उजळणी वर्ग जणू काळाच्या पडद्याआड गेले की काय असे चित्र अनुभायास मिळाले. NAAC च्या दृष्टीकोनातून कदाचित थोड्याफार प्रमाणात अशा सेवातर्गत प्रशिक्षणाच्या मार्गांचा जीवंतपणा टिकून आहे असे म्हणावे लागेल.

**आव्हाने:**

शिक्षक प्रशिक्षणाबाबत आज मागणी आणि पुरवठा याचा नियम विस्कळीत झाला आहे. आज शिक्षक प्रशिक्षणात परिवर्तनाची लाट येणे गरजेचे आहे. त्याबाबत भरीव प्रयत्न होणे गरजेचे आहे. अर्थकुशलतेबाबत अनुदानित, विनाअनुदानित आणि कायम विनाअनुदानित इत्यादी प्रकारचा असंतोष पहावयास मिळतो आणि प्रत्यक्षात जाणवतोसुद्‌धा. शिक्षक प्रशिक्षणाच्या उज्ज्वल भविष्यासाठी बऱ्याच बाबतीत परिवर्तन घडवून आणण्याची नितांत आवश्यकता आहे. शिक्षक प्रशिक्षणाबाबत विविध आयोगांनी सुचविलेल्या शिफारशींचा आजच्या व भविष्यकालीन दृष्टीकोनातून फेरआढावा घेणे गरजेचे आहे. उपरोक्त शिक्षक शिक्षणाच्या समस्यांचा विचार करता पुढील भविष्यकालीन आव्हानांना शिक्षक प्रशिक्षकाना सामोरे जावे लागेल असे वैयक्तिकरित्या वाटते. ती आव्हाने पुढीलप्रमाणे:

१. बी. एड. प्रशिक्षणाबाबत हुशार विद्‌यार्थ्यांना आकर्षित करणे.
२. अभ्यासक्रमात विद्‌यार्थ्यांना अष्टपैलुत्व आणण्याच्या बाबतीत सक्षमता आणणे.
३. मूल्यमापनात पारदर्शकता आणणे.
४. संशोधनात गुणात्मकता आणणे.
५. अनुदानित, विनाअनुदानित आणि कायम विनाअनुदानित याबाबतचे निश्चित धोरण ठरविणे.

**६. व्यावसायिक पात्रता गुणात्मकदृष्ट्या वाढविणे.**

**७. प्रवेशशुल्क निश्चित करणे.**

**८. प्रगत साधनांची उपलब्धता व कार्यकुशलता वाढविणेबाबत प्रयत्न करणे.**

**९. प्रवेशपरीक्षेची फीस भरली की प्रवेश निश्चित हे नीती बदलणे.**

**१०.प्रशिक्षकाला स्वत:चे प्रशिक्षण स्वत: समजून घेऊन पूर्ण करावयाचे आहे. ही जाणीव निर्माण करणे.**

**११.माहिती संप्रेषण तंत्रज्ञान याचा गुणात्मक वाढ करण्याच्या दृष्टीने प्रयत्न करणे.**

**१२. सोयीसुविधा कागदोपत्री आहेत पण त्या प्रत्यक्षात आणण्याचे.**

**१३. प्रशिक्षणासाठी शाळांची उपलब्धता करून शाळा व शिक्षक आणि प्रशिक्षण यातील अंतर कमी करणे.**

**१४. फी मध्ये सवलत, शिष्यवृत्ती, अनुदान, विद्यावेतन इत्यादींचा समावेश करणे.**

**१५.महाविद्यालयांची संख्यात्मक वाढ नियंत्रित करणे.**

**१६.सर्व स्तरावरील नियंत्रण समित्यांचे पारदर्शी धोरण स्वीकारणे.**

**इत्यादी...**

**वरील शिक्षक प्रशिक्षणाच्या समस्या व त्यासमोरील आव्हानांचा मागोवा घेता तज्ज्ञांनीच अभ्यासपूर्वक योग्य त्या शिफारशी सुचवाव्या असे म्हणणे यथायोग्य ठरेल. या शिफारशीचा सर्वांनी शिक्षक प्रशिक्षणात स्वीकार करणे अपेक्षित आहे. विविध आयोगानी सुचविलेल्या शिफारशींचा स्वीकार शैक्षणिक वर्ष २०१५ मध्ये झालेला दिसून येतो आहे. शिक्षक प्रशिक्षणाच्या उज्ज्वल भविष्यासाठी भूतकाळातील चुका, सद्यस्थितीत असणारे दोष, उणीवा, कमतरता, त्रुटी दूर करून राष्ट्रीय गरजा यावर आधारित भविष्यकालीन शिक्षक प्रशिक्षण गुणवत्तापूर्ण करण्यासाठी विशेष प्रयत्न तात्काळ होणे नितांत गरजेचे आहे. त्यासाठी सर्व स्तरावर कठोर पाऊले उचलण्याची आवश्यकता आहे.**

**निवडक संदर्भ**

**घोरमोडे के. यु., कला घोरमोडे, २००७, भारतातील शैक्षणिक आयोग व समित्या, नागपूर विद्या प्रकाशन.**

**जगताप ह. ना., २००६, शिक्षणातील नवप्रवाह व नवप्रवर्तने, पुणे, नित्यनूतन प्रकाशन.**

**नरवणे मीनल, २००८, भारतातील शैक्षणिक आयोग व समित्या, पुणे, नित्यनूतन प्रकाशन.**

**पानसे रमेश, २००६, आजचे शिक्षण उद्याचे जीवन, पुणे डायमंड पब्लिकेशन.**

**मोरे चंद्रकांत., सदानंद भिलेगावकर, २००८, शिक्षक शिक्षण, पुणे, नित्यनूतन प्रकाशन.**

**शेवतेकर शारदा., मदन नुकुमे., २०११, भारतीय शिक्षक-शिक्षण प्रणाली, नागपूर विद्या प्रकाशन.**

**शिवणेकर ल. मा. २००९, अध्यापक भूमिका व कार्य, पुणे, नित्यनूतन प्रकाशन.**